MHJN090003272025

म.कौं.हिं.सं.अधिनियम क्र.०८/२०२५
शाहिस्ता वि. अमजद.

**<u>निशाणी क्र. १२ वरील आदेश</u>**

अर्जदाराने सदरचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनीयम कलम २३ प्रमाणे प्रतिमहा रु.२०,०००/– अंतरीम पोटगी मिळणे बाबत दाखल केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार हिने मुळ अर्ज गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्या विरुद्ध कौ.हिं.म.सं.अधिनीयम कलम १२ अन्वये दाखल केला असुन सदर अर्जाद्वारे अर्जदार हिने तिच्यासाठी व मुलांसाठी गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्याकडुन दरमहा रक्कम रु.२०,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याकरीता मागणी केली आहे. अर्जदार हिच्या मते सदर प्रकरण दाखल केल्या पासुन गैरअर्जदाराने तिला घरातुन बेदखल केल्यामुळे ती माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने पती म्हणुन कोणतीही नैतीक जबाबदारी पाळली नाही.

३. अर्जदार हिच्या मते, अर्जदार ही आपल्या माहेरी वास्तव्यास असुन तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिला लहान मुले असल्याने तिला कोणतेही काम धंदा करणे शक्य होणार नाही. तसेच तिचे कोणतेही तांत्रीक कौशल्याचे शिक्षण झाले नाही. त्यामुळे तिला तिच्या कुटूंबाचा खर्च भागविणे शक्य नाही. अर्जदार हिस कोणाचाही आधार राहिलेला नाही. अर्जदार हिचा कपडालत्ता, औषधोपचार, मासिक घरभाडे व किराणा

याची अर्जदार हीस गैरसोय होत आहे. गैरअर्जदार हा सक्षम असुन सदर प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार हिला रु.२०,०००/– देण्यास सक्षम आहे. त्याकरीता सदर अर्ज मंजुर होण्याची विनंती अर्जदार हिने केली आहे.

४. सदर अर्जावर गैरअर्जदार यांनी त्यांचे निशाणी १४ खाली म्हणणे दाखल केले. त्यांच्या मते, अर्जदार हिचा गैरअर्जदार क्र. १ सोबत विवाह होण्यापुर्वी दोन वेळा विवाह होवुन तिने तिच्या पतीपासुन घटस्फोट घेतले आहे. अर्जदार क्र. ३ हा अर्जदार हिला तिला तिच्या पहिल्या पतीपासुन झाला असल्याने त्याची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार यांची नाही. अर्जदार ही हेकेखोर आहे. तसेच सतत माहेरी ये जा करते व गैरअर्जदार क्र. १ सोबत वरुडी येथे राहण्यासाठी चला म्हणुन भांडण करत असते. अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या कपाटातुन पैसे व मौल्यवान दागीने नेले आहेत. गैरअर्जदार हा किरायाने रिक्षा चालवुन स्वतःची उपजिवीका करत आहे. अर्जदार ही कुरकूरे कंपनीत मजुरी करुन ६०० ते १००० रुपये रोज कमविते. अर्जदार हिने गैरअर्जदारास क्रुरतेची वागणुक दिली आहे त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

५. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.पठाण व गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.एस.जे.खडके यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्या विरुद्ध सदरचा अर्ज कौ.हि.म.सं. अधिनियमानुसार दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिचा पती असुन क्र.२ ते ३ हे गैरअर्जदार क्र. १ चे नातेवाईक आहेत. गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यामध्ये अर्जदारासोबतचे नातेसंबंध त्यांना मान्य

आहेत.

७. अर्जदार हिने सदर अर्जाद्वारे अंतरीम पोटगी म्हणुन रक्कम रुपये २०,०००/– इतकी पोटगी मागितली आहे. अर्जदार हीने तिचे मालमत्ता व दाईत्व शपथपत्र निशाणी क्र.१३ वर दाखल केले असुन त्यामध्ये अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे तिने शपथेवर सांगीतले आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने त्याचे मालमत्ता व दाईत्व शपथपत्र निशाणी क्र.१५ वर दाखल केले असुन तो सध्या भाडयाने रिक्षा चालवत असल्याने त्याला प्रति मला रु.१०,०००/– ते १२,०००/– उत्पन्न मिळते. त्यामधुन तो त्याचा व त्याच्या कुटूंबाचा खर्च भागवितो.

८. अर्जदार हिला पत्नी या नात्याने सांभाळण्याची जबाबदारी गैरअर्जदार यांनी आहे. सध्या अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या पासुन विभक्त राहत आहे. ती गैरअर्जदार क्र.१ हा नाकारु शकत नाही. अर्जदार हिला गैरअर्जदार क्र. १ पासुन एक अपत्य व पहिल्या पतीपासुन एक अपत्य आहे. अर्जदार हीच्या मते गैरअर्जदार याने तिला तिच्या पहिल्या पतिच्या अपत्यासह स्वीकारुन विवाह केला होता. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाचे कोणतेही पुरावे दाखल केलेले नाही. परंतु गैरअर्जदार याने त्याचे उत्पन्न १० ते १२ हजार इतके असल्याचे शपथेवर सांगीतले आहे. सध्याची महागाई तसेच अर्जदाराचा दरमहाचा घरभाडे, खाणे–पिणे, औषधोपचार व इतर खर्च याचा विचार करता सदर अर्जापोटी दरमहा अर्ज दाखल तारखेपासुन ५,०००/– इतकी पोटगी देणे योग्य होणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार हिचा अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार याने अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दि.२५.०४.२०२५ पासुन दरमहा रक्कम रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) अंतरीम पोटगी निकाल लागेपर्यत द्यावी.

स्वा/-

दि.२२.०४.२०२६

**(श्री. जी.एन. लंघे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,बदनापूर.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे/आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नावः- दिक्षा सं.देशमुख (नि.श्रे.)

न्यायालयाचे नावः- श्री.जी.एन.लंघे, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बदनापूर.

अपलोड तारीखः- २२.०४.२०२६

स्वा/-

स्वाक्षरी